# राज ठाकरे झोपले त्याचा राग शिवसेनेवर का काढता? निष्क्रियतेवर घोषणाबाजी, पोस्टरबाजी हा उपाय नाही

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

आजचा हा अग्रलेख फक्त आणि फक्त कार्यकर्त्यांसाठी आहे. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते स्वत:च्या संसारावर तुळशीपत्रं ठेवून दिवसरात्र पक्षासाठी झोकून देतात. स्वत:च्या मुलीचा वाढदिवस साजरा करणार नाहीत पण खिशातील पैसे टाकून नेत्याच्या वाढदिवसासाठी केक आणतील, नेत्याने नुसता इशारा केला की समोरच्याचे डोके फोडून जेलमध्ये जातील, कार्यक्रम चांगला झाला पाहिजे म्हणून दिवसरात्र झटतील, ऊन, पाऊस, वारा, घरातील आजारपण, रिकामा खिसा, नाराज कुटुंब या कशाचाही विचार न करता हा कार्यकर्ता झटत असतो. या कार्यकर्त्यांसाठी आमचा जीव तुटतो म्हणूनच हा मायेचा उपदेश की, बाबांनो, आता पूर्वीसारखे नेते राहिले नाहीत, ध्येय, धोरणंही उरली नाहीत, राजकारणातील समाजकारण संपून गेलंय, फक्त सत्ता आणि संपत्तीची दलदल उरली आहे. अशा या वातावरणातही कार्यकर्ता बनायचे असेल तर जरूर बना, पण कळपातली मेंढरं बनू नका. कुणीही यावं आणि कुठंही हाकावं यासाठी तुमचा जन्म नाही.

हे सर्व आज मनसेच्या कार्यकर्त्यांना सांगतोय, पण तेच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनाही सांगायचे आहे. आपण मराठी माणसं वेडी असतो. आपण हृदयाने काम करतो, आपली प्रतिक्रिया ही विचार करून दिलेली नसते तर ती मनातून उचंबळून येते. हा माणसातला फार मोठा गुण आहे. पण त्याचा अतिरेक झाला की अविवेक होतो. जे घडू नये ते घडतं. आज तसंच चालले आहे. बाबांनो, थोडं स्थिर व्हा. भावनांना विचारांचा लगाम लावा. नाहीतर तुमच्या आपसातील भांडणात तिसरे कोणीतरी लोण्याचा गोळा घेऊन जाईल.

शिवसेनेने मुंबई पालिकेतील मनसेचे सहा नगरसेवक फोडले म्हणून संतप्त मनसे कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरे आणि शिवसेनेच्या विरोधात घोषणाबाजी केली. शिवसेना भवनाच्या समोर शिवसेनेच्या विरोधातील पोस्टर लावले. या मनसेच्या कार्यकर्त्यांना एक प्रश्न विचारायचा आहे. तुमचे नेते राज ठाकरे हा सर्व प्रकार होत असताना झोपले होते, त्याचा राग तुम्ही शिवसेनेवर का काढत आहात? गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रभरातील मनसेच्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी इतर पक्षात उड्या घेतल्या. नाशिक पालिकेत तर मनसेचा एकही नगरसेवक मनसेत राहिला नाही. त्यावेळी असा थयथयाट का झाला नाही? मनसे पार शून्यावर यायची वेळ आली तरी कुणाला जागच येत नसेल तर त्यात मनसे सोडून जाणाऱ्यांचा काय दोष आहे? राज ठाकरेंच्या भोवती जी चौकडी आहे ती साहेबांना चुकीची माहिती देते, हे सांगून सांगून सर्वच थकले आहेत. निवडणूक जवळ आली की एक दोन आंदोलने करून पक्ष जगवायचा आणि उरलेली वर्षे आराम करायचा ही मनसे नेत्यांची पद्धत आहे. यामुळे नाराज नेते दुसऱ्या पक्षात जाणारच आहेत, हे अटळ आहे. जसजशी निवडणूक जवळ येईल तसतसे हा ओघ वाढेल. तुम्ही कुणाकुणाला थांबविणार आहात आणि कोणती आशा दाखवून थांबविणार आहात? आज शिवसेनेच्या विरोधात पोस्टर लावली, उद्या शिवसैनिक आणि मनसैनिक एकमेकांना भिडतील आणि भाजपा मजा बघेल. 'कृष्णकुंज'च्या बाहेर जमलेले चांदिवली आणि इतर मतदारसंघातील कार्यकर्ते शिवसेनेत गेलेल्या आपल्या नगरसेविकांविरोधात आग ओकत होते. जे गेले ते नाराज होऊन गेले. आता तुम्हाला वाव मिळालाय म्हणून आरडाओरड करताय. मात्र उद्या तुमचेही तेच होऊ शकते. काल तुम्हाला राज ठाकरे भेटले. पण त्याआधी तुमच्या मनातलं ऐकायला तुमचे साहेब तुम्हाला असे कधी भेटले होते का? तुमच्या तक्रारी जाणून घेतल्या का? जे नगरसेवक गेले ते पैसे घेऊन गेले असा आरोप होत आहे. पण हे नगरसेवक जाणारच होते कारण ते पक्षावर नाराज होते. त्यांनी जर पैसे घेतले असतील तर त्यांना मिळालेली ही फुकटची मिळकत आहे, इतकेच म्हणता येईल.

काही मनसे कार्यकर्त्यांचा हा राग आहे की शिवसेनेने हे नगरसेवक फोडले. एका भावाने म्हणे दुसऱ्या भावाच्या पाठीत खंजीर खुपसला, तुम्ही मागितले असते तर आम्ही सात दिले असते आता छक्के नेले, ही सर्व हास्यास्पद वाक्यं आहेत. पक्ष नेत्यांच्या निष्क्रियतेमुळे पक्ष रसातळाला गेला तरी कार्यकर्ते शांत, काँग्रेसने मनसेचे नगरसेवक फोडले तरी कार्यकर्ते शांत, राष्ट्रवादीने फोडले तरी काही बिघडत नाही. पण शिवसेनेने फोडले की आकांडतांडव सुरू, हा काय प्रकार आहे? कार्यकर्ते भावनांना बळी पडतात आणि नेते भावनांना हवा देतात हा याचा अर्थ आहे. मुळात दोन्ही ठाकरे बंधू कधीही एकत्र येणार नाहीत, हे आम्ही वारंवार सांगितले आहे. दोघांचे स्वतंत्र राजकीय पक्ष आहेत आणि आजकाल राजकीय पक्ष जसे नेते चालवतात तसेच हे पक्ष चालले आहेत. भावाने नगरसेवक फोडले म्हणून मनसे कार्यकर्ते चिडले. पण मनसे अध्यक्ष राज ठाकरे भाषणात आणि पत्रकार परिषदेत जेव्हा या भावाच्या विरोधात बोलतात तेव्हा हेच कार्यकर्ते टाळ्या वाजवतात. २०१४ च्या निवडणुकीत तर राज ठाकरेंनी शिवसेनेवर जोरदार हल्ला चढविला होता. तेव्हाही मनसैनिक टाळ्या पिटत होते. तेव्हा बंधुभाव कुठे जातो? पक्षावर नाराज असलेले शिवसेनेत गेले तर राग येतो, पण मुळात शिवसेनेवर नाराज होऊन पक्ष सोडलेल्या राज ठाकरेंचे नेतृत्व मान्य होते याचा विसर पडला का? शिवसेनेने आपले नगरसेवक पळविले याचा जास्त राग येण्याचे म्हणूनच काही कारण नाही. शिवसेनेने पळविले नसते तर भाजपाने पळविले असते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन मनसे पक्षाची स्थिती आज काय आहे, यावर आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. तसे झाले नाही तर काय होईल? मराठीत एक म्हण आहे, 'वड्याचे तेल वांग्यावर', या म्हणीप्रमाणे उगाच शिवसेनेवर चिडत राहाल आणि तुमच्या भावनांचा नेतेमंडळी दुरुपयोग करतील. या सर्व गोष्टींचा विचार करा, निव्वळ मेंढरं बनू नका.